महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष
सेवानिवृत्त न्यायमुर्ती, श्री.मारोती गणपती
गायकवाड यांचे मानधन निश्चितीबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-१०/२०१७/प्र.क्र.१९९/मावक

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: ०३ नोव्हेंबर, २०१७

वाचा:- १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-११/ २००८/ प्र.क्र.७०८/ मावक, दि.११ फेब्रुवारी,२०१३.

प्रस्तावना:-

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल रिट याचिका क्रमांक ९३०/१९९० इंद्रा सहानी आणि इतर विरुध्द भारत सरकार आणि इतर यामध्ये दि. १६/११/१९९२ रोजी दिलेल्या निर्देशास अनुसरून राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग या प्रवर्गात एखाद्या जातीचा समावेश करण्यासाठी किंवा त्या प्रवर्गातून एखादी जात वगळण्यासाठी आलेल्या मागण्या व तक्रारीबाबत तपासणी करण्यासाठी तसेच मागासवर्गीयांच्या यादीमध्ये (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता) सामाजिक-आर्थिक निकषांनुसार प्रगत व उन्नत गट किंवा व्यक्ती निर्धारीत करून संबंधित जात वगळण्याकरीता अभ्यासपुर्ण शिफारस राज्य शासनास करण्यासाठी शासन निर्णय दि.१५ मार्च १९९३ अन्वये राज्य शासनाने स्थायी समिती नियुक्त केली होती. शासन निर्णय दि.१५ मे,१९९५ अन्वये सदर स्थायी समितीचे नामकरण “राज्य मागासवर्ग आयोग” असे करण्यात आले आहे. सदर आयोगाचे अध्यक्ष सेवानिवृत्त न्यायमुर्ती, श्री.मारोती गणपती गायकवाड यांचे मानधन निश्चितीची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ (सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३४) च्या कलम ३ च्या उप कलम (१) आणि उप कलम (२) मधील (क),(ख) आणि (ग) आणि कलम ४ च्या उपकलम (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन या अधिनियमात प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून दिलेली कार्य पार पाडण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, अधिसूचना क्र.सीबीसी-१०/२०१७/प्र.क्र.१९९/मावक, दि. ०२ नोव्हेंबर, २०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगावर अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त न्यायमुर्ती, श्री.मारोती गणपती गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त न्यायमुर्ती, श्री.मारोती गणपती गायकवाड यांचे प्रतिमाह रु.१,६०,०००/- इतके मानधन निश्चितीस शासन मंजुरी देण्यात येत आहे. तसेच श्री.मारोती गणपती गायकवाड हे मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमुर्ती असल्याने त्यांचा दर्जा निवृत्त न्यायमूर्तीचा राहील. अध्यक्षांना देय करण्यात आलेला दर्जा हा राजशिष्टाचारापुरता मर्यादित राहील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १८८/२०१७/व्यय-१४ दि.३१/१०/२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०६१६५५३३१६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2017.11.06 17:02:43 +05'30'

(सि.अ.झाल्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
५) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, विधान भवन, मुंबई
६) मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
७) सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ , लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
९) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, लेखा परिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१०) सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१५) वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई
१६) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
१९) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
२०) सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद (गट-अ)
२१) सेवानिवृत्त न्यायमुर्ती,श्री.मारोती गणपती गायकवाड, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला कॅान्सिल हॅालसमोर, पुणे -४११००१
२२) सचिव, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
२३) निवडनस्ती, का. मावक.